**Indian Streams Research Journal**
**Vol - I , ISSUE - IV May 2011** **ISSN:-2230-7850**

# लहू कानडे यांच्या कवितेतील विद्रोह

**प्रा. प्रकाश कांबळे**
मराठी विभाग, के.एन. भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी.

**प्रस्तावना :**

दलित कवितेला आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान लाभलेले आहे. दलित, शोषित, वंचितांच्या जगण्यातील अन्यायाला विद्रोहाच्या माध्यमातून व्यक्त करणारी कविता म्हणून लहू कानडे यांच्या कवितेचे वेगळेपण आपणाला पाहताक्षणी दिसून येते. स्वतःचा वेगळा असा ठसा उमटविणारी कविता म्हणून 'क्रांतीपर्व', 'टाचाटिभा', 'तळ ढवळताना' या कवितासंग्रहांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. सामाजिक, चिंतनात्मक, क्रांतीच्या कविता तसेच विदारक सत्य मांडणाऱ्या, डॉ.आंबेडकरांवर निष्ठा सांगणाऱ्या कविता, चित्रकविता, प्रतिकात्मक कविता, प्रेम कविता, गझलसदृश कविता, जीवनमूल्यांची निष्ठा सांगणारी कविता, मार्क्सवादी कविता आदि वैशिष्ट्यांनी लहू कानडे यांच्या कवितेचे वेगळेपण उठून दिसते.

लहू कानडे यांच्या कवितेतून नवे प्रतिमाविश्व, नवीन आशय, नवा अनुभव, वैशिष्ट्यपूर्ण मांडणी आदि कवितांनी लहू कानडे यांची कविता वेगळा आत्मानुभव प्रतिबिंबीत करताना दिसते. क्रांतीला सन्मुख असणाऱ्या कविता खरोखरच लढ्याला प्रवृत्त करतात. दलित कवितेला आलेले साचलेपण संपवून टाकण्याचे कार्य लहू कानडे यांच्या कवितेने केलेले दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून लहू कानडे यांच्या कवितेतून अभिव्यक्त झालेले विद्रोहपण जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

लहू कानडे यांच्या कवितेचा पिंडच मुळी समाजनिष्ठ आहे. सामाजिक, जीवनात ज्यांच्या माथ्यावरचे सर्वस्व हिरावून घेतलेले आहे. त्यांच्या जीवनातील अन्यायीपणाची प्रतिबिंबे लहू कानडे यांच्या कवितेत उमटलेली दिसतात. सामाजिक अन्यायाविरुद्ध गंभीर भाष्य त्यांच्या कवितेत आढळून येते. सामाजिक न्यायाची आस ठेवणारी त्यांची कविता नेहमीच वेगळेपणाचा प्रत्यय देते. ते लिहितात,

'सतत उन्हाळयानंढगाळलेलं माझं आभाळ । पावसाळत आहे
जातीव्यवस्थेच्या नर्काह तुरुंगातून बाहेर पडण्यासाठी
मला घरकुल हवं आहे' .... (क्रांतीपर्व, पृ. ०२)

जातीव्यवस्थेच्या नरकातून बाहेर पडण्यासाठी कानडेंची कविता प्रयत्नशील असताना दिसते. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्यायाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या, वर्षानुवर्षे अन्यायाच्या नरकात खितपत पडलेल्या समाजाला बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखविण्याचा प्रयत्न लहू कानडे प्रस्तुत कवितेच्या माध्यमातून करताना दिसतात.

चित्रमय कविता हा लहू कानडे यांच्या कवितेचा एक महत्त्वाचा गुणधर्म सांगता येईल. भोवतालच्या सामाजिक जीवनातील अंतःस्तरापर्यंतचे चित्र लहू कानडे यांच्या कवितेतून प्रतिबिंबित होताना दिसते. आपल्या जातीच्या चौकटीत अडकून, तेच-तेच पारंपरिक व्यवसाय केल्याने दलितांची प्रगती होत नाही असे कवीचे एक सामाजिक निरीक्षण आहे. जातीपातीच्या आणि व्यवसायाच्या चौकटी मोडून बाहेर पडण्याचे कवी आवाहन करतो आहे.

'जन्मलास ते चांभार म्हणून । आणि आयुष्यभर चांभारच राहिलास
सरं जग बदलून गेलं । पण तू साला नाही सुधरलास' (क्रांतीपर्व, पृ. ३४)

सर्व जग परिवर्तनाच्या उंबरठयावर उभे असताना दलित मात्र जातीच्याच चौकटीत अडकून पडल्याची खंत कानडेंची कविता अभिव्यक्त करताना दिसते. कवीला 'चांभारच राहिलास' या शब्दांतून समाजातील दीन, हीन, निरक्षरता, गुलामी, लाचारी व्यक्त करावयाची आहे. इथल्या वर्णवादी व्यवस्थेने जन्मतःच कपाळी गोंदलेल्या जातीच्या शिक्क्यातून दलितांची सुटका होत नाही याचे दुःख कवी या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

'शिवारातील पाखरांच्या । काळजावरच घातलेत घाले
आता पेटतील झाडे काटेरी । भलरीचेच झालेत भाले' (टाचाटिभा, पृ. १६)

भारतीय जातीव्यवस्थेने नेहमीच माणसाला गुलामीची वागणूक दिली. अमानुषतेने वागविले,सर्रास त्यांचे शोषण केले. या भीषण अन्यायाचे पडसाद लहू कानडे यांच्या कवितेत उमटताना दिसतात. 'टाचाटिभा' या कवितेतील उपरोक्त 'रानपाखरांचे हत्याकांड' ही कविता सवर्णाने केलेल्या छळाचा जाब विचारताना दिसते. 'रानपाखरांचे हत्याकांड' हे शीर्षकच सामाजिक अन्यायाचे नेमकेपणाने दृश्य डोळयांसमोर उभे करते. 'रानपाखरं' ही प्रतिमा गरीब जनतेला उद्देशून वापरलेली आहे. त्यांचे हत्याकांड होताना कोणाच्याच हृदयाला पाझर फुटत नाही. म्हणून त्यांना वाचविण्यासाठी झाडेच पेटली पाहिजेत. 'भलेरीचे भाले' झाले पाहिजेत असे कवी सूचित करताना आढळतो. असे झाले नाही तर रानपाखरांचे हत्याकांड सुरुच राहील.

'सकाळी संध्याकाळी । मोठ्या मालकांना सलाम केले
टीचभर पोटासाठी बायका पोरं गुलाम केलेस ।
गावकुसाबाहेर राहून मोठे जोडे शिवून दिलेस' (टाचाटिभा, पृ. २६)

'कोंडू चांभार' या चित्रात्मक कवितेतून दलित समाजातील संपूर्ण समाजाचे दुःख प्रतित होताना दिसते. दिवसभर काम करायचे, सवर्णांचे उंबरे झिजवायचे, पोटासाठी बायकापोरांना गुलामी करायला लावायची आणि आपला स्वाभिमान सोडून जगावे लागणे यासारखे दुःख कवी प्रस्तुत कवितेच्या माध्यमातून आपणासमोर ठेवतात. गावाबाहेर राहून सवर्णांचे जोडे शिवून देण्यातच सारेजण मश्गुल आहेत. कुणीही विद्रोह करण्याची भाषा करत नाही याची खंत लहू कानडे आपल्या कवितेतून व्यक्त करताना दिसतात. लहू कानडे यांच्या कवितेविषयी भाष्य करताना ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''क्रांतीचे गाणे गाणारी ही कविता प्रतिमासृष्टीने जशी नटलेली आहे. त्याचबरोबर आजवरच्या दलित कवितेपेक्षा काही वेगळेपणही घेऊन आलेली आहे. या कवितेचा बहुसंख्य भाग चित्रकवितेने व्यापलेला असून त्यांची संवादीवृत्ती, प्रवाही व डोळस आहे.''[१] सामाजिक जीवनातील विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवण्याचे काम लहू कानडे यांची कविता करताना दिसून येते.

'जेव्हा प्रकाशाचा पहिला किरण । या वस्तीवर दस्तक देईल
पोळात झोपलेली उपाशी । एक एक राणीमाशी जागी होईल
अन् पंख फैलावून गुणगुणत जाईल मधाच्या शोधात
तेव्हा रिते होईल हे माणसांचे डंपिंग ग्राउंड
उदासवाणे दिवसभरासाठी .....(तळ ढवळताना, पृ. ३१)

चार्तुवर्ण्य व्यवस्थेने जन्मानेच उच्च आणि नीच ठरविले. त्यामुळे जो ज्या जातीत जन्मला, त्याच जातीचा त्याला व्यवसाय करावा लागे. त्यामुळेच दलित समाजाची सगळी जिंदगी गुलामी, अन्याय सहन करण्यातच वाया गेली. कवी या सगळयांपासून नवीन जगण्याच्या शोधात निघालेला दिसतो. त्यांच्या कवितेतील सकारात्मक बाबींवर भाष्य करताना महेंद्र भवरे म्हणतात, ''वास्तवाचे प्रखर भान आणि भूतकाळाने जखडून ठेवलेल्या जाचकतेतून मुक्तीसाठी भविष्याविषयीची तेवढीच सजगता कानडेंच्या कवितेतून प्रतिबिंबीत होताना दिसते. संघर्षाची ऊर्मी मरता कामा नये आणि ही ऊर्मी मारु पाहणाऱ्या जाचक मानसिकतेतून बाहेर पडले पाहिजे अशीच कवी आणि कवितेची भूमिका आहे हे लक्षात येते.''[२] लहू कानडे यांची कविता वास्तव परिस्थितीत अन्यायाशी दोन हात करु पाहणाऱ्या दलित बांधवांना भविष्यातील मुक्तीचा मार्ग दाखविण्याचा मनापासून प्रयत्न करते.

लहू कानडे यांची कविता चिंतनगर्भ विद्रोहाचा आविष्कार म्हणून आपणासमोर प्रकट होताना दिसते. प्रेमाच्या संवादातूनही विद्रोहाचा अंगार घेऊन प्रज्वलीत होणारी त्यांची कविता नाविन्यपूर्ण तर आहेच, परंतु वास्तवाच्या भक्कम पायावर उभी आहे.

'तेव्हा सखे । आता मी हे सुरुंग पेरलेले । यांच्या वाती तूच पेटवल्या पाहिजेस ।
या संस्कृतीच्या प्रत्येक गढीला । त्यांच्या प्राचीन तत्त्वासह जमीनदोस्त करण्यास
तयार राहिलं पाहिजेस । (टाचाटिभा, पृ. ४७)

अन्यायी, शोषणाच्या पायावर उभ्या असणाऱ्या संस्कृतीला उद्ध्वस्त करण्यासाठी कवी सुरुंग पेरु इच्छितो. मानव मुक्तीच्या लढ्यासाठीच त्याने ही संस्कृती उद्ध्वस्त करणारी सुरुंगे शब्दांच्या माध्यमातून पेरुन ठेवलेली आहेत.

एकूणच लहू कानडे यांच्या कवितेचे स्वरुप पाहिल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष आपणास सूत्ररुपाने पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) लहू कानडे यांची कविता सामाजिक जीवनातील आणि विशेषतः दलितांच्या जीवनातील अन्यायी परंपरेवर, शोषणावर प्रखर भाष्य करताना दिसते.

२) लहू कानडे यांची कविता चित्रमय असून समाजातील रंजल्या-गांजलेल्यांची अस्वस्थ करणारी चित्रे ती अत्यंत आस्थेने रेखाटताना दिसते.

३) लहू कानडे यांच्या कवितेचे प्रेरणास्त्रोत इतर दलित कवींप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा असल्याचे दिसून येते. माणसाला माणसाप्रमाणे वागवणारी सामाजिक रचना प्रस्थापित करणे हे त्यांच्या कवितेचे ध्येय असल्याचे दिसून येते.

४) लहू कानडे यांच्या काही कविता प्रेम कवितांचे रुप धारण करतात. परंतु त्या प्रेमकवितेतही सामाजिक जाणिवांचा विद्रोह खोलवर प्रकट होताना दिसतो.

**संदर्भः-**

१) कोत्तापल्ले, नागनाथ, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,प्रथमावृत्ती,२००८, पृ.६१

२) भवरे, महेंद्र, मराठी कवितेच्या नव्या दिशा, लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई,प्रथमावृत्ती,२०१०, पृ.४३